
लांडग्याची फजिती

हंगेरीतील एक लोककथा

लेखन, चित्रे व सजावट: **वॅल बीरो**

अनुवाद: **सुजाता गोडबोले**





लांडग्याची फजिती

हंगेरीतील एक लोककथा

लेखन, चित्रे व सजावट: **वॅल बीरो**

अनुवाद: **सुजाता गोडबोले**



कोणे एके काळी एक शेतकरी होता. स्वभावाने अगदी खडूस आणि आधाशी. खादाड तर इतका की हिवाळ्याच्या दिवसात तो घरी बसून दिवसातून सहा वेळा जेवत असे. मग तो इतका लठ्ठ झाला की तो चरबी भरलेल्या पोत्यासारखा दिसू लागला.






त्याच्या तबेल्यात त्याने एक घोडा, एक बोकड आणि एक डुक्कर ठेवले होते.


पण तो इतका कंजूष होता की त्यांना पुरेसे खायला देखील देत नसे.

बिचाऱ्या प्राण्यांची उपासमार होत असे आणि हिवाळा संपेपर्यंत त्यांचा केवळ हाडाचा सापळा शिल्लक रहात असे.

वसंत ऋतू सुरु झाल्यावर एक दिवस शेतकरी फारच रागावला. आपल्या प्राण्यांकडे पाहून तो ओरडला, “किती हडकुळे झाला आहात पाहिलेत का? थंडीच्या दिवसात तुम्ही चांगले लठ्ठ का नाही झालात? मला आता तुमचा काहीच उपयोग नाही, चला, चालते व्हा!” आणि त्याने फाटक उघडून टाकले. “आता तुम्हाला जरी लांडग्याने खाल्ले तरी मला त्याची पर्वा नाही!”



नेमका त्याच वेळी एक लांडगा आजूबाजूला फिरत होता आणि त्याने शेतकऱ्याचे बोलणे ऐकले. लांडगा भुकेला होता, त्याला जेव्हा घोडा बाहेर येताना दिसला, तेव्हा तो पळत घोड्याजवळ गेला आणि त्याला म्हणाला, “शेतकरी म्हणाला होता, त्याप्रमाणे मी आता तुला खातो!”




घोडा म्हणाला, “ठीक आहे. माझी काहीच हरकत नाही. पण माझा हा हाडाचा सापळा खाऊन तुझे पोट मुळीच भरणार नाही. त्यापेक्षा आता मी डोंगरावर जाऊन तिथे चांगले गवत खाऊन घेतो. मी जेव्हा परत येईन, तेव्हा मी चांगला धष्टपुष्ट असेन, मग मला खाऊन तू खुश होशील.”

लांडग्याला ही कल्पना पसंत पडली आणि त्याने घोडयाला जाऊ दिले.


थोडे पुढे गेल्यावर लांडग्याला पळत निघालेले डुक्कर भेटले. लांडग्याने त्याला थांबवले.

“शेतकरी म्हणाला त्याप्रमाणे मी आता तुला खाणार आहे!”

डुक्कर म्हणाले, “तुला हवे तसे कर. पण जरा माझ्याकडे पहा तर खरे! नुसती हाडे तर शिल्लक आहेत! तू जर थोडे दिवस थांबलास, तर मी छान लठ्ठमुठ्ठ होईन आणि माझ्या गुबगुबीत पिल्लांना देखील बरोबर घेऊन येईन. बघ, मग तर तुला मोठी मेजवानीच मिळेल...”



गुबगुबीत पिल्लांच्या विचाराने लांडग्याच्या तोंडाला तर पाणीच सुटले. त्याने डुकराला आपल्या वाटेने जाऊ दिले.




तेवढ्यात बोकड येताना दिसले म्हणून लांडग्याने त्याच्यासमोर उडी मारून त्याला थांबवले.

“शेतकरी म्हणाला होता, तसे मी आता तुला खातो!”

बोकड म्हणाले, “जरूर! पण आता माझ्या शरीरात फक्त हाडे उरली आहेत. मी डोंगरावरून परत येईपर्यंत जर तू थांबलास, तर तुला छान जेवण मिळेल.”

“हा म्हणतो ते खरेच आहे,” लांडगा स्वतःशीच पुटपुटला, आणि त्याने बोकडाला देखील जाऊ दिले.



सगळे प्राणी परत आल्यावर होणाऱ्या मोठ्या मेजवानीचा विचार करण्यातच लांडग्याचा सगळा वेळ जात होता. त्याला धष्टपुष्ट घोड्याची, लठ्ठ बोकडांची स्वप्ने पडत होती. गलेलठ्ठ डुक्कर आणि गुबगुबीत पिल्लांचा विचार आला की त्याच्या तोंडाला पाणी सुटत असे. ही सगळी जनावरे डोंगरावरून आपल्या जेवायच्या टेबलाकडे कधी पळत येतात याची लांडगा वाट पाहत होता.

काही दिवस गेल्यावर आता पहिल्यांदा कोण येते याची लांडगा आतुरतेने वाट पाहू लागला.

सर्वात प्रथम आले डुक्कर आणि मागोमाग पळत आली सहा पिल्ले. ते सर्व चांगले गुबगुबीत दिसत होते.

“दिलेला शब्द तुम्ही पाळला म्हणून धन्यवाद,” लांडगा म्हणाला. “या, आता मी तुम्हाला खातो, मी केव्हापासून तुमचीच वाट पाहत होतो!”





डुकराने उत्तर दिले, “अर्थात, पण कृपा करून फक्त एकच दिवस थांब. त्याचं काय झालं, की तिकडे डोंगरावर माझ्या पिल्लांचे बारसे करायला गुरुजीच नव्हते. म्हणून माझ्या पिल्लांना अजून नावेच नाहीत. आणि अजून नाव देखील नसलेल्या पिल्लांना खायला तुला कसे आवडेल, नाही का?”


नाव देखील नसलेल्या पिल्लांना खाणे म्हणजे फारच दुष्टपणा होईल हे लांडग्याला देखील पटले.

डुकराने लांडग्याचे आभार मानले आणि त्याच्याकडे पाहून एक डोळा मारला. “इकडे माझ्याजवळ ये म्हणजे मी तुला त्यांची नावे कानात सांगते.”



कानात नावे सांगण्याऐवजी डुकराने लांडग्याचा कान आपल्या दातात पकडला आणि त्याला जोरजोरात हिसके दिले. अखेर लांडगा ओरडला, “थांब, थांब, मी तर नुसती चेष्टा करत होतो!”

पण तरीही डुक्कर त्याला हिसके देतच राहिले आणि ते पाहून सर्व पिल्ले देखील त्याचे चावे घेत त्याच्याशी धक्काबुक्की करू लागली.



शेवटी लांडग्याने कसेबसे स्वतःला त्यांच्या तावडीतून सोडवले आणि जीव घेऊन पळत सुटला.

लांडगा जरा दम खातो न खातो, इतक्यात तिकडून आले बोकड.

लठ्ठ बोकडाला पाहून लांडगा आपली धक्काबुक्की विसरला आणि त्याच्या तोंडाला परत पाणी सुटले.

लांडगा बोकडाला म्हणाला, “आता तू इतका लठ्ठ होऊन माझे जेवण म्हणून आला आहेस हे फारच छान झाले. पण आता त्या डुकरासारखा मला त्रास देऊ नकोस हं!”



“मी कशाला तसे करेन? मी तुझ्यासाठीच तर इतका लठ्ठ झालो आहे,”
बोकडाने साळसूदपणे म्हटले.
हे ऐकून लांडगा इतका खुश झाला की त्याने बोकडाला हळुवारपणे खाण्याचे वचन दिले.
“धन्यवाद!” बोकड म्हणाले. “तू फक्त तुझे तोंड उघड आणि मी तुझ्या तोंडातच उडी मारेन म्हणजे तू मला एका घासात गिळू शकशील.”
मग लांडग्याने आपले तोंड उघडले आणि डोळे मिटून घेतले. बोकडाने आपली मान खाली केली आणि जोरात उडी मारायला निघाला.
पण त्याच्या तोंडात उडी मारण्याऐवजी...





...बोकडाने लांडग्याला इतक्या जोरात धडक दिली की तो कोलमडून खाली पडला. बोकडाने मग त्याला इतक्या जोरदार धडका मारल्या, की लांडगा ओरडू लागला,

“अरे, असे करू नकोस! मी तर नुसती मजा करत होतो!”

बोकडाने मग त्याच्यावरून उडी मारली आणि दूर पळून गेला. लांडगा कसाबसा झुडुपात जाऊन बसला आणि आपल्या जखमा चाटू लागला.



थोड्याच वेळात छान धष्टपुष्ट झालेला घोडा आला.
त्याला पाहून लांडग्याची भूक परत चाळवली.

लांडगा घोड्याला म्हणाला, “तू परत आलास हे फार बरे केलेस. आता मी तुला आनंदाने खाईन.
माझी जेवायची वेळ झालीच आहे.”

घोड्याने मान हलवली. “तू मला जरूर चवीचवीने खा, पण अगोदर एकदा मला गावात जाऊ दे,
मला एका नवरीला तिच्या लग्नासाठी नेऊन पोचवायचे आहे. मी परत आलो की मग तू मला आनंदाने खा.”

यात काही तरी डाव असेल अशी लांडग्याला शंका आली.
“मला पण तुझ्याबरोबर यायचे आहे आणि नवरी पहायची आहे.”


घोडा म्हणाला, “ठीक आहे. बस माझ्या पाठीवर.”

लांडगा धडपडत घोड्याच्या पाठीवर
बसला, घोडा जोरात दौडू लागला
आणि लवकरच ते गावात पोचले.







गावात खूप लोक लग्न सोहळ्यासाठी नटून थटून जमले होते.



जोरात दौडत येणाऱ्या घोड्यावर लांडगा बसलेला पाहून लोकांना चांगलाच धक्का बसला. ते ओरडू लागले, “अरे बापरे! लांडगा आला आहे! आणि तो देखील घोड्यावर बसून!” काही जण आपला जीव वाचवण्यासाठी पळाले आणि लपून बसले. पण काहींनी मात्र झाडू आणि लाठ्या-काठ्या घेऊन लांडग्याला घोड्यावरून खाली खेचले.



“मला मारू नका!” लांडगा विनवणी करू लागला. “मी तर केवळ चेष्टा करत होतो!” पण तरीही लोकांनी त्याला मार मार मारले. लांडगा कसाबसा आपला जीव वाचवून जंगलात पळून गेला.



जंगलात एक लाकूडतोड्या आपले काम करत होता. मोठी गडबड ऐकून त्याने वर पाहिले तेव्हा दमलेला आणि घाबरलेला एक लांडगा त्याच्याकडे येताना त्याला दिसला, म्हणून तो झाडामागे लपून बसला.

लांडगा फार दमला होता म्हणून तो देखील त्याच झाडाच्या दुसऱ्या बाजूला लपला. त्याला परत एकदा, म्हणजे तिसऱ्यांदा फसवण्यात आले होते. “बरोबरच आहे! हा तर माझाच वेडेपणा होता. आता माझ्या डोक्यावर कोणीतरी एक चांगला फटका द्यायला हवा.”



ते ऐकून लाकूडतोड्या म्हणाला, “तुला जर तेच हवे असेल, तर हे घे!” असे म्हणून त्याने लांडग्याच्या डोक्यावर एक जोराचा फटका मारला.

“अरे, अरे, पण मी तर फक्त गमतीने म्हणत होतो!” लांडगा तक्रारीच्या सुरात म्हणाला आणि दुखणारे डोके चोळत लांब पळून गेला.



त्याच्या मनात विचार आला, “खरोखर हे जग कुठे चालले आहे? आजकाल लोकांना साधी चेष्टाही समजत नाही की काय?”